मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पालिकेच्या कचरा सेवा शुल्क वसुलीला स्थगिती

## राज्य शासनाचे आयुक्तांना निर्देश

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेने पूर्वलक्षी प्रभावाने सुरू केलेल्या कचरा सेवा शुल्क वसुलीला अखेर राज्य शासनाने बुधवारी स्थगिती दिली. मुख्यमंत्र्यांकडे बैठक होईपर्यंत ही स्थगिती लागू असणार आहे. दरम्यान, आत्तापर्यंत तीन लाख ७५ हजार ३१७ मालमत्ताधारकांनी ४७ कोटी १६ लाखांच्या शुल्काचा भरणा केला आहे. राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी कचरा सेवा शुल्क (उपयोगकर्ता) निर्धारित केले. त्यानुसार महापालिकेने १ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला. घरटी दरमहा ६० रुपये, व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना क्षेत्रफळानुसार शुल्क आकारण्यात येत आहे. पूर्वलक्षी प्रभावाने २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांची शुल्क आकारणी सुरू केली. मात्र चार वर्षांचे शुल्क आकारण्यास शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांनी तीव्र विरोध केला. आमदार महेश लांडगे यांनी पावसाळी अधिवेशनात या मुद्द्यावरून लक्षवेधी उपस्थित केली होती. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची सविस्तर बैठक घेण्यात येईल, तोपर्यंत स्थगिती देण्याचे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले होते. मात्र, पाच महिन्यानंतरही त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. अखेरीस हिवाळी अधिवेशन संपण्याच्या शेवटच्या दिवशी स्थगिती आदेश आला. कचरा सेवा शुल्काबाबत मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्यात येईल. तोपर्यंत महापालिकेकडून आकारणी करण्यात येणाऱ्या शुल्क वसुलीला स्थगिती देण्यात येत असल्याचे निर्देश नगरविकास खात्याचे कार्यासन अधिकारी शिवाजी चव्हाण यांनी आयुक्तांना दिले. शासनाने कचरा शुल्क रद्द करण्याऐवजी स्थगिती दिल्याने भविष्यात शुल्काची टांगती तलवार राहणार आहे.




> राज्य सरकारचा कचरा सेवा शुल्क स्थगितीबाबतचा आदेश प्राप्त झाला आहे. शुल्क भरलेल्या मालमत्ताधारकांच्या शुल्काचा प्रस्ताव आयुक्तांना सादर करण्यात येईल. त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल.
>
> **– यशवंत डांगे,**
> सहायक आयुक्त, आरोग्य विभाग

> २०१९ मध्ये लागू केलेले शुल्क २०२३ मध्ये व्याजासह वसूल केले जात होते. प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा फटका मालमत्ताधारकांना बसत होता. मुख्यमंत्र्यांच्या नियोजित बैठकीत सकारात्मक निर्णय होईल.
>
> **–महेश लांडगे,** आमदार

# पिंपरी-चिंचवडमधील पाणीपुरवठा विस्कळीत

## चारची उर्ध्व नलिका रायझिंग मेनला गळती लागल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या रावेत पंपिंग स्टेशन येथील टप्पा क्रमांक तीन, चारची उर्ध्व नलिका (रायझिंग मेनला) गळती लागल्याने शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. बुधवारी सायंकाळचा पाणीपुरवठा झाला नाही. उद्याचाही (गुरुवार) पाणीपुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. शहरवासीयांना पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पवना नदीतील रावेत बंधारा येथून महापालिका पाणी उचलते. उर्ध्व नलिकेला गळती लागल्यामुळे टप्पा क्रमांक तीन, चारवरील चिंचवडचा काही भाग, नेहरुनगर, थेरगाव, काळेवाडी, रहाटणी, पिंपळे सौदागर, पिंपळेगुरव, सांगवी, वाकड, निगडी प्राधिकरण, ताथवडे, किवळे, मामुर्डी, चिखली, मोशीचा काही भाग, जाधववाडी, रुपीनगर, तळवडे, कृष्णानगर, यमुनानगर, आकुर्डी या भागातील पाणीपुरवठा दुरुस्तीच्या कामासाठी बुधवारी बंद ठेवला होता. त्यामुळे सायंकाळी पाणीपुरवठा झाला नाही. उद्या गुरुवारीही पाणीपुरवठा अनियमीत व कमी दाबाने होईल.



दुरुस्ती काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. रात्री बारापर्यंत दुरुस्तीचे काम पूर्ण होईल, असे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले. गृहनिर्माण संस्थांमधील तळ मजल्यावरील साठवण टाकीमध्ये पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. पहिल्या मजल्यावर, स्वयंपाक घरात महापालिका पाणी देऊ शकत नाही. टाकीवर इलेक्ट्रिकल मोटर, पंप लावून इमारतीवरील साठवण टाकीवर पाणी नेणे आवश्यक आहे. ज्यांच्याकडे साठवण टाक्यांची व्यवस्था नाही. त्यांनी इमारतीच्या तळ मजल्यावर, गच्चीवर साठवण टाकी बांधण्याचे आवाहन करत इमारतीच्या कोणत्याही मजल्यावर पाणीपुरवठा केला जाणार नसल्याचे पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

# पिंपरी चिंचवडकरांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधांसाठी आता कृती आराखडा

## शहरातील रुग्णालयांतील पायाभूत आणि आरोग्य सुविधा सक्षम आहेत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
महापालिकेच्या शहरातील सुसज्ज रुग्णालयांतील पायाभूत आणि आरोग्य सुविधा सक्षम आहेत. या सुविधा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, त्यातील अडचणी दूर करण्यासाठी आरोग्य कृती आराखडा तयार केल्या जात असल्याचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी सांगितले. महापालिकेने राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्राने प्रदान केलेल्या रचनेनुसार आरोग्य कृती योजना आराखडा तयार करण्याचे निर्देश राज्य शासनाने




दिले आहेत. त्याअंतर्गत महापालिका आणि युनिसेफ संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यशाळा पार पडली. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. अभयचंद्र दादेवार, डॉ. शिवाजी ढगे, डॉ. श्रीकांत सुपेकर, डॉ. अभिजित सांगडे उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने शहरात राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल जागतिक पातळीवर घेतली जात आहे. महापालिकेस विविध पुरस्कारही मिळाले आहेत. नवी दिशा, झोपडपट्टी शून्य कचरा व्यवस्थापन यांसारखे महत्त्वाकांक्षी उपक्रम महापालिका राबवीत आहे. नागरिकांचाही या उपक्रमांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे. प्रभाग आणि शहर पातळीवरील आरोग्य कृती आराखडा तयार करण्यासाठी महापालिकेची निवड करण्यात आली आहे. त्यासाठी प्रभागनिहाय विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युनिसेफ संस्थेशी समन्वय साधून काम करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी दिल्या. आशासेविकांचे प्रशिक्षण, त्यांना येणारी आव्हाने, अडचणी, गर्भधारणेच्या अत्याधुनिक सुविधा, लहान मुलांचे आरोग्य, स्वच्छतेची गुणवत्तावाढ, मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.


### महापालिकेस विविध पुरस्कार

» महापालिकेने राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्राने प्रदान केलेल्या रचनेनुसार आरोग्य कृती योजना आराखडा तयार करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्याअंतर्गत महापालिका आणि युनिसेफ संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यशाळा पार पडली. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. अभयचंद्र दादेवार, डॉ. शिवाजी ढगे, डॉ. श्रीकांत सुपेकर, डॉ. अभिजित सांगडे उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने शहरात राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल जागतिक पातळीवर घेतली जात आहे. महापालिकेस विविध पुरस्कारही मिळाले आहेत.

# रेखाचित्रांच्या मदतीने १०० पेक्षा अधिक गुन्हेगार जेरबंद

## डिजिटल युगातही ‘रेखाचित्र’ पोलिसांसाठी ठरली महत्वाची

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सध्या डिजिटल युगात गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणात बदलत आहे. गुन्हेगारांना पकडण्यामध्ये सीसीटीव्ही चा मोठा वाटा आहे. असं असलं तरी अजूनही रेखा चित्राच्या माध्यमातून गुन्हेगारांना पकडण्यात येत आहे. पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात पोलीस पदक विजेते खुशाल वाळुंजकर यांनी आत्तापर्यंत १८० आरोपींची रेखाचित्र रेखाटली असून पैकी १०० पेक्षा अधिक गुन्हेगारांना रेखा चित्राच्या माध्यमातून



जेरबंद करण्यात आलं आहे. पिंपरी- चिंचवड शहरासह पुणे शहरात आणि जिल्ह्यात दररोज खून, दरोडा, बलात्कार, चैन स्नॅचिंग अशा प्रकारची गुन्हे घडतात. या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यात सीसीटीव्हीच महत्त्वपूर्ण योगदान आहे. प्रत्येक गल्ली बोळात आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही असतोच. परंतु, काही ठिकाणी केवळ प्रत्यक्षदर्शी असतात. अशावेळी रेखाचित्र रेखाटूनच आरोपी पर्यंत पोहोचण्याचा पर्याय असतो. अशी माहिती रेखाचित्रकार खुशाल वाळुंजकर यांनी दिली. दगडाने ठेचून हत्या करण्यात येणाऱ्या मृतदेह ओळखण्यास अनेकदा अडचणी येतात. अशावेळी देखील रेखाचित्र महत्त्वाचे आणि तपासाला दिशा देणारे ठरते. कोविडकाळात खुशाल वाळुंजकर यांनी रेखा चित्राच विशेष प्रशिक्षण घेतलं. अगोदर पोलिसांसोबत तपास करणारे खुशाल रेखाचित्राचे प्रशिक्षण घेतल्यानंतर स्वतः पोलिसांना रेखा चित्राच्या माध्यमातून आरोपी पर्यंत पोहोचवत. खुशाल हे २००८ ला पोलीस भरती झाले. पुणे शहरातून त्यांनी आपल्या नोकरीला सुरुवात केली. खुशाल यांनी आत्तापर्यंत १८० गुन्ह्यातील आरोपींची रेखाचित्र रेखाटले असून १०० पेक्षा अधिक गुन्हेगारांना रेखा चित्राच्या माध्यमातून जेरबंद करण्यात यश आलं आहे. त्यांच्या या कामगिरीचे विशेष कौतुक करत त्यांना पोलीस पदक देखील प्रदान करण्यात आलं होतं. खुशाल वाळुंजकर यांनी सांगितलं की, माझ्या आयुष्यात जेजुरीची केस आव्हानात्मक होती. एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यात आला. तो तपास अत्यंत आव्हानात्मक होता. आजीसह जात असलेल्या अल्पवयीन मुलीसोबत आरोपी सहभागी झाला. काही वेळानेच निर्जन ठिकाणी अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे सुरू केले. ही बाब अल्पवयीन मुलीने आजीला सांगितली. मात्र, आरोपीने आजीला बेदम चोप देऊन त्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. त्या ठिकाणी सीसीटीव्ही आणि इतर कोणी नव्हतं. रेखाचित्र रेखाटण्यासाठी मला बोलावण्यात आले.

# शेतकरी प्रश्नांवरून अमोल कोल्हे आक्रमक

## आक्रोश मोर्चाचे आयोजन; शरद पवारही राहणार उपस्थित

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

देशातील सर्व घटकांतील नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. त्या नागरिकांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठविल्यावर खासदारांचे निलंबन केले जाते, यासह अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि केंद्र, राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ डिसेंबरला शिवनेरीपासून भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाला सुरुवात होणार आहे, तर ३० डिसेंबर रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातून हा मोर्चा मार्गस्थ होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मोर्चाची सांगता सभा होणार आहे. तसेच या सभेला महाविकास आघाडीमधील अनेक नेते मंडळीदेखील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या



अध्यक्षतेखाली पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयामध्ये भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत अमोल कोल्हे यांनी अनेक विषयांवर भाष्यदेखील केले. यावेळी खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, मी आणि सुप्रिया सुळे यांनी कांदा निर्यात बंदीच्या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी केली. त्या मागणीनंतर आम्हा दोघांना अध्यक्षांनी निलंबित केले. ही कारवाई आमच्यावरच थांबली नाही, तर तब्बल १४१ खासदारांना अध्यक्षांनी निलंबित केले आहे. त्या कारवाईमधून अध्यक्ष हे निलंबित करण्याच्या मूडमध्ये होते की काय? पण, या निलंबनाच्या कारवाईमधून केंद्र सरकारचा बुरखा फाटला असल्याचे सांगत केंद्र सरकारवर त्यांनी टीका केली.

तसेच ते पुढे म्हणाले की, माझ्यासह देशातील जनतेने २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संसदेतील पायर्‍यांवर नतमस्तक होताना पाहिले आहे. पण, आज संसदेतील सहकार्‍यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींना संसदेत येऊन निवेदन करावे, हे सांगावे लागत आहे. त्यामुळे नेमका खरा चेहरा कोणता, असा सवाल उपस्थित करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर त्यांनी निशाणा साधला. तसेच ते पुढे म्हणाले की, त्यामुळे एकूणच देशातील आणि राज्यातील परिस्थिती लक्षात घेऊन, केंद्र आणि राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ ते ३० डिसेंबरदरम्यान शिवनेरी ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन होत आहे. त्या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले का, या प्रश्नावर अमोल कोल्हे म्हणाले की, राम मंदिराचे उद्घाटन होत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे, पण मला तरी निमंत्रण नाही.

मात्र, माझी एक अपेक्षा आहे की, राम मंदिराचे उद्घाटन थाटामाटात करा, पण या देशात रामराज्य आणण्याचीदेखील तेवढीच मोठी जबाबदारी आहे, याचीदेखील जाणीव ठेवा आणि रामराज्य आले पाहिजे, अशी भूमिका कोल्हे यांनी मांडत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. देशातील सर्व घटकांतील नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. त्या नागरिकांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठविल्यावर खासदारांचे निलंबन केले जाते, यासह अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि केंद्र, राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ डिसेंबरला शिवनेरीपासून भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाला सुरुवात होणार आहे, तर ३० डिसेंबर रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे.

### कांदा बंदीच्या प्रश्नावर चर्चा

**» राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मोर्चाची सांगता सभा होणार आहे. तसेच या सभेला महाविकास आघाडीमधील अनेक नेते मंडळीदेखील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयामध्ये भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत अमोल कोल्हे यांनी अनेक विषयांवर भाष्यदेखील केले. यावेळी खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, मी आणि सुप्रिया सुळे यांनी कांदा निर्यात बंदीच्या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी केली.**

# शैक्षणिक अभ्यासक्रमातून निवडणूक प्रक्रियेचे धडे

## निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.युजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांना लोकशाही, मतदान आदी प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे, त्यासाठीचे श्रेयांक निश्चित करणे, वयाची १७ वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा मतदार नोंदणीसाठी संस्थास्तरावरील आराखडा तयार करून एआयएसएसई आणि युडायइस संकेतस्थळाला जोडणे, संबंधित विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करणे, अध्यापनासाठी शिक्षक-प्राध्यापकांना ऑनलाईन किंवा ऑफलाइन पद्धतीने प्रशिक्षित करणे, विद्यार्थ्यांमध्ये मतदान आणि त्याबाबतचे प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी अभियान राबवण्या संदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेमध्ये, विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, भारतीय निवडणूक आयोगाचे मोबाइल उपयोजन, बॅलेट युनिट, मतदान विभाग, नियंत्रण विभाग, पीठासीन अधिकारी, दोन मतदान अधिकारी, पोलिंग एजंट, मतदान कप्पे आदींबाबतची माहिती दिली जाईल. निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देऊन जागरूक करण्याचा उद्देश आहे. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजावण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाणार आहे. तसेच येत्या २५ जानेवारी रोजी शैक्षणिक संस्थांमध्ये ‘राष्ट्रीय मतदार दिन’ साजरा करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्दे श विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजावण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.

# कुणी शहर कार्यालयासाठी जागा देता का जागा?

## पुण्यातील सत्ताधारी भाजपवर ही वेळ का आली?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्रात तसेच राज्यात सत्ता असलेल्या आणि महापालिकेत पाच वर्षे सत्तेत राहिल्यानंतरही भारतीय जनता पक्षावर मध्यवर्ती कार्यालयासाठी जागा बदलण्याची वेळ आली आहे. जोगेश्वरी मंदिराजवळील कार्यालयानंतर जंगली महाराज रस्त्यावरील हॉटेल सन्मान येथे कार्यालय थाटल्यानंतर महापालिका भवनासमोर मुक्काम हलविण्यात आला. मात्र जागा मालक मुदत वाढवित नसल्याने शहर कार्यालय स्थलांतरित करण्याची वेळ जगातील सर्वाधिक मोठ्या राजकीय पक्ष असल्याचा दावा आणि सर्वाधिक देणगी मिळणाऱ्या भाजपवर आली आहे. डीपी रस्त्यावर नवे कार्यालय लवकरच सुरू होणार असून त्याबाबतच्या वृत्ताला भाजप पदाधिकाऱ्यांनीही दुजोरा दिला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नव्या



कार्यालयातून भाजपचे कामकाज होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिका भवनासमोरील एका इमारतीमध्ये भाजपचे कार्यालय तीन वर्षापूर्वी जंगली महाराज रस्त्यावरील सन्मान हॉटेलमधून स्थलांतरित करण्यात आले. या भागात स्थलांतरित होण्यापूर्वी त्याचा मोठा गाजावाजा करण्यात आला. पार्किंगची सुविधा आणि बहुमजली इमारतीमध्ये प्रशस्त जागा उपलब्ध होणार असल्याचा दावाही भाजप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला होता. या जागेतून तीन वर्षे कारभार चालला. मात्र जागा मालकाने मुदतवाढ देण्यास नकार दिल्याने नव्या जागेचा शोध घेण्याची वेळ भाजप पदाधिकाऱ्यांवर आली. त्यानुसार डीपी रस्त्यावर एक प्रशस्त जागा निश्चित करण्यात आली आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनीही त्याला दुजोरा दिला आहे. मात्र देशातील सर्वाधिक मोठा पक्ष असलेल्या भाजपला हक्काचे कार्यालय का मिळत नाही, असा प्रश्न उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे. महापालिका भवनाजवळील जागा अपुरी पडत होती. पक्षाचा वाढता विस्तार लक्षात घेता नवे प्रशस्त कार्यालय हवे होते. जागेच्या मर्यादेमुळे नवे कार्यालय घेण्यात आले आहे. येथे पार्किंगचीही सुविधा असून मोठ्या स्वरूपातील कार्यक्रम घेण्यासाठीही अनेक सुविधा येथे आहेत. कायमस्वरूपी जागेसाठीही प्रयत्न सुरू असून प्राथमिक चर्चाही झाली आहे, असे घाटे यांनी सांगितले. मात्र जागा नेमकी कोणत्या कारणासाठी सोडावी आणि शोधावी, लागली याची चर्चा मात्र शहराच्या राजकीय वर्तुळात रंगण्यास सुरुवात झाली आहे.

भाजपला हक्काचे कार्यालय मिळावे, यासाठी काही वर्षांपूर्वी प्रयत्न करण्यात आले होते. गेल्या दहा वर्षांपासून केंद्रात सत्ता आहे. तर राज्यातही पक्ष सत्तेत असून पाच वर्षे महापालिकेची सत्ताही त्यांच्या ताब्यात होती. मात्र त्यानंतरही पक्षाला हक्काची कायमस्वरूपी जागा मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने डेंगळे पूल परिसरात नव्याने कार्यालया उभारले आहे. यापूर्वी टिळक रस्त्यावरील गिरे बंगल्यातून पक्षाचे कार्यालय होते. तेथून अनेक वर्षे कामकाज करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही नारायण पेठेतील केळकर रस्त्यावरून लालबहादूर शास्त्री रस्त्यावर स्वत:चे कार्यालय घेतले आहे. काँग्रेसचे कामकाज कित्येक वर्षांपासून काँग्रेस भवनातून चालत असून ठाकरे गटाचे डेक्कन परिसरातील पुलाची वाडी येथे तर शिवसेनेचे सारसबाग परिसरात कार्यालय आहे.

### भाजपला कार्यालय का मिळत नाही

» महापालिका भवनासमोरील एका इमारतीमध्ये भाजपचे कार्यालय तीन वर्षापूर्वी जंगली महाराज रस्त्यावरील सन्मान हॉटेलमधून स्थलांतरीत करण्यात आले. या भागात स्थलांतरीत होण्यापूर्वी त्याचा मोठा गाजावाजा करण्यात आला. पार्किंगची सुविधा आणि बहुमजली इमारतीमध्ये प्रशस्त जागा उपलब्ध होणार असल्याचा दावाही भाजप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला होता. या जागेतून तीन वर्षे कारभार चालला. मात्र जागा मालकाने मुदतवाढ देण्यास नकार दिल्याने नव्या जागेचा शोध घेण्याची वेळ भाजप पदाधिकाऱ्यांवर आली. त्यानुसार डीपी रस्त्यावर एक प्रशस्त जागा निश्चित करण्यात आली आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनीही त्याला दुजोरा दिला आहे. मात्र देशातील सर्वाधिक मोठा पक्ष असलेल्या भाजपला हक्काचे कार्यालय का मिळत नाही, असा प्रश्न उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे.

# पीएमआरडीएच्या विकास आराखड्यावरच प्रश्नचिन्ह

## प्रारूप विकास आराखडा (डीपी) अंतिम मंजुरीच्या टप्प्यात

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील प्रारूप विकास आराखडा (डीपी) अंतिम मंजुरीच्या टप्प्यात आहे. हिवाळी अधिवेशनानंतर या आराखड्याला मंजुरी मिळेल, असे पीएमआरडीएकडून सांगण्यात येत आहे. मात्र, हिवाळी अधिवेशनात प्रारुप आराखड्यावर प्राप्त हरकती, सूचनांवर सुनावणी घेऊन पीएमआरडीएला अहवाल सादर करण्यासाठी नियोजन समिती गठित करण्यात येत असल्याचे उत्तर दिले आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या विकास आराखड्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. खडकवासलाचे आमदार भीमराव तापकीर आणि दौंडचे आमदार राहूल कुल




यांनी पीएमआरडीएच्या प्रारूप विकास आराखड्यात त्रुटी असून चुकीचे आरक्षण टाकण्यात आल्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर मुख्यमंत्री शिंदे लिखित उत्तर देताना म्हणाले, 'प्रसिद्ध झालेला आराखडा प्रारूप आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २५ (२) च्या तरतुदीनुसार प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर दिलेल्या मुदतीत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना, हरकतींवर सुनावणी घेऊन नियोजन प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी नियोजन समिती गठित करण्यात येत आहे. नगर आणि प्रदेश रचना / पर्यावरण या क्षेत्रातील चार तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली असून तीन अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. ही समिती विहित मुदतीत प्राप्त सर्व हरकती, सूचना यांवर सुनावमी घेऊन त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणाला सादर करेल. त्यानुसार प्राधिकरण आणि पुणे महानगर नियोजन समिती प्रारूप विकास योजनेत आवश्यक ते फेरबदल प्रस्तावित करून तो शासनाला अंतिम मंजूरीसाठी सादर करेल. त्यानंतर शासनाकडून त्याला अंतिम मंजूरी देण्यात येईल.